राजा दुष्यन्ताला शकंतलेपासून भरत नावाचा मुलगा जन्मला. तो चक्रवर्ती झाला. तो भरत दुष्यन्ताचा उत्तराधिकारी असून त्याला हत्तीचे बल प्राप्त झाले होते. त्याच्या नावामुळे त्याच्या कुळातील लोकांना भरतवंशीय असे नाव रूढ झाले.

(१) या ठिकाणी 'यस्य नाम्ना तु भारता:' या चरणातील भारता: या पदाचा अर्थ निश्चितपणे भरतदेश असा करणे कठिण आहे. अनेकवचनी कुलनावे देशवाचक असू शकतात. माऱ्या एकट्याच सुताने येथे तरी स्वर्ग चढ ता येत नाही. येथे त्या पदाचा अर्थ भरताचे वंशज एवढ ाच आहे. कारण अशा वंशवाचक अर्थालाच सर्वत्र पुष्टी मिळते. (महाभारत, अदिपर्व, अध्याय अ०२/६७, ७४, ९६, ९७ इ.) आणि इतरत्र एखाद्या पुराणातही त्या पदाचा अर्थ देशवाचक होत असलेला कोठेही आढ ळत नाही. तसा अर्थ लावल्यास तो सुसंगत ठरत नाही. भरतवर्षाच्या अभिप्रायाने 'भारता:' असे कोठेही म्हटलेले आढ ळत नाही. म्हणून फक्त याच ठिकाणी त्याचा अर्थ भरतदेश किंवा भरतवंशीयांचा देश असा का व कोणत्या आधारे करावा हे समजत नाही. तसा पूर्व संदर्भही नाही. येथे देशाच्या नामकरणाचा विषयही प्रस्तुत नाही. परंपरागत राज्यवितरणाचा कालानुक्रमही नाही. येथे फक्त दुष्यन्तपुत्र भरत आणि त्याच्या वंशजांचेच कथन आहे.

(२) उलट प्रसिध्द महाभारत या ग्रंथमधील विधानाप्रमाणे सर्वत्राच शकुंतलापुत्र सर्वदमनाचे नाव एका प्रसंगाने भरत असे रूढ झाले आणि पुढे त्याच्या नावावरुन त्याच्या पुर्वीच्या पुरुवंशाला भारतवंश आणि त्या कुळातील लोकांनाच भारत असे नाव पडले. महाभारतात 'हे भारत!' असे संबोधन मुख्यत: सर्व पाण्डवांना आणि त्या वंशशाखेतील इतर अनेकांना व्यक्तिश: संबोधन करताना वापरलेले आहे. भारतातील सर्व रहिवासीजनांना, दुष्यन्ताच्या वंशजांशिवाय इतरांना किंवा भरतवर्षाला उद्देशून एकदाही भारता: हे पद वापरलेले आढ ळत नाही. या देशात शकुंतलापुत्र भरत याच्या वंशजाशिवाय समकालीन असे इतर अनेक थोर वंश विद्यमान

असल्याचा पुरावा त्याच ग्रंथात अनेक ठिकाणी उपलब्ध आहे. मात्र तेथे एकाही ठिकाणी दुष्यन्तपुत्र भरताच्या नावावरुन या देशाचे नवे नामकरण झाले असा उल्लेख सापडत नाही. त्या नामकरणाच्या पूर्वीच्या देशनामाचा पत्ता नाही. भरतापूर्वी दुष्यन्त स्वत: कोणत्या देशात राहात होता अशा सहज व स्वाभाविक प्रश्नाचेही उत्तर सापडत नाही. वर्षनामकरणाच्या संदर्भात दुष्यंतपुत्र भरतासंबंधीचे विधान वस्तुस्थितीला धरुन नसल्याने त्याला त्याच ग्रंथात अगर दुस-या कोणत्याही ग्रंथात पुष्टी मिळत नाही.

(३) मात्र जैन, वैदिक, वैष्णव, शैव अशा प्रणालीतील आर्ष, अर्धमागधी, संस्कृत, प्राकृत, मराठी, हिंदी, कन्नड इत्यादी भाषेतील सर्वच ग्रंथात सुस्पष्ट आणि सुसंगत अशी कित्येक विधाने उपलब्ध असून त्या सर्व ठिकाणी भरतवर्षाच्या नामकरणाच्या संदर्भात ऋषभपुत्र भरताचाच पाठपुरावा केलेला आहे. आणि त्या सर्व विविध ग्रंथातील सुसंवदित्य विस्मयजनक शास्त्रशुध्द आहे

(४) दुष्यन्ताच्या सर्वदमन नावाच्या मुलाला भरत असे नाव पडले असले तरी तो प्रजेचे भरण-पोषण करणारा या अर्थाने मुळीच नव्हे. उलट त्या सर्वदमनाचे व त्याच्या आईचे (शकुंतला) भरण-पोषण करण्याचे कर्तव्य दुष्यन्त राजाने विशिष्ट प्रसंगी स्वीकारले आणि त्या प्रसंगाच्या निमित्ताने सर्वदमनाचे नाव भरत असे पडलेले आहे. (महाभारत, आदि ७५, श्लोक ११ ते १५). तेव्हा भरणात् प्रजानाञ्च ा ही निरुक्ती दुष्यन्तपुत्र भरताच्या बाबतीत शास्त्रशुध्द वाटत नाही. त्या नामकरणप्रसंगी तो भरण-पोषण-कर्ता नसून त्याच्याच भरण-पोषणाची सोय झाली असल्याने तो पोषक नव्हे तर पोषित व भर्तव्यच ठरतो.

(५) शिवाय ऋषभपुत्र भरताचा उल्लेख पदोपदी पढमचक्रवट्टी असा आढळतो. प्रथम चक्रवर्ती या विधानाबाबतीत कोठेच दुमत किंवा विसंवाद नाही. ते सार्वत्रिक सत्य आहे. मात्र दुष्यन्तपुत्र भरत सम्राट असला तरी त्याला प्रथम चक्रवर्ती असे कोठेही म्हटलेले नाही. त्याचेच अनेक पूर्वज प्रसिध्द आणि सबल सम्राट होते. त्या सर्वांपेक्षा त्याचे कोणतेही वैशिष्टय नोंदलेले नाही. नहुष, ययाति, जनमेजय, अयूतनायी, पुरु, दक्ष, दुष्यंत असे किती तरी परएिक्ंरमी राज

पुर्वकाळी या भूमीवरचे सम्राट होते. पण यांपैकी कोणाचेही नाव या वर्षाला प्राप्त झालेले नाही. मात्र नाभि-ऋषभ-भरत ही क्षत्रिय परंपरा आणि हिमवर्ष-नाभिवर्ष-(भगवान वर्ष)-भरतवर्ष ही देशाच्या नामकरणाची परंपरा सर्वत्र सुसंगत आहे.

(६) उलट चक्रित्वाच्या दृष्टीनेही सर्वदमनाची बाजू असावी तितकी समर्थनीय नाही-

यस्त्वयं मानवो द्वीपस्तिर्यग्याम: प्रक्रिर्तित: ।
य एनं जयते कृत्स्नं स सम्राडिति कीर्तित: ॥
मत्स्यपुराण, अ०११४, श्लो. १५.

ही हिंदू पुराणतील एकछत्री अधिराज्य किंवा सम्राटाची व्याख्या अथवा परंपरागत जैन धारणेतील चक्ररत्नप्रभृती समस्त १४ रत्नांची व ९ निधींची संप्राप्ती, शिवाय प्रत्यक्षात षट्खंडात्मक सर्व क्षेत्रविभागांवरील संपूर्ण अधिपत्य यांपैकी कोणतीहि एखादी बाबसुध्दा दुष्यन्तपुत्र भरताला अगर अन्य कोणत्याही भरताला लागू होत नाही. म्हणून केवळ अश्वमेधाच्या संकल्पनेच्या बळावर ऋषभपुत्र भरताशिवाय अन्य कोणत्याही भरतराजाला वर्षाधिपती मानण्यासारखी स्थिती नाही. अशा प्रसंगी त्यांपैकी कोणालाहि या वर्षक्षेत्राच्या नामकरणाचा अधिष्ठाता कल्पणे दूरान्वयानेही संभवत नाही. शिवाय अश्वमेधादी यज्ञप्रकारांची संभावनाच मुळी पश्चातकालीन आहे.

दोन भरतांचा कालानुक्रम

आणि वंशाच्या व कालखण्डाच्या दृष्टीने तर दुष्यंतपुत्र भरतापेक्षा ऋषभपुत्र भरत फारच पुरातन आहे. स्वायंभुव-प्रियव्रत-आग्नीध्र-नाभि-ऋषभ- भरत या मार्कण्डेय पुराणाच्या वंशावळीला अनुसरुन भरतचक्री केवळ ५वा वंशज ठरतो. तर दुस-या परंपरेप्रमाणे नाभी हा शेवटचा मनू आणि ऋषभेय भरत हा फक्त दुसरा वंशज ठरतो. उलटपक्षी दुष्यंतपुत्र भरत हा आद्य मनुपासूनच नव्हे तर केवळ पुरुवंशानंतरचाच कमीत कमी १९ वा वंशज ठरतो. (आदिपर्व ९५) आद्य मनूपासून गणना केली तर तो त्याहून कितीतरी दूरचा ठरतो. कारण मनुवंश आणि पुरुवंश यामध्ये दुसरे कित्येक वंश होऊन गेलेले आहेत. सर्वदमन, त्याचे वडील दुष्यंत आणि त्यांचे सर्व पूर्वज

भरतवर्षातच राहात होते. त्यांमध्ये काही सम्राटही होते. यावरुन दुष्यंतपुत्र हा कालगणनेनुसार फारच पश्चात्कालीन ठरतो. त्याच्या वंशातील कोणत्याही पुरुषाच्या नावाने या देशाचे स्मृतिचिन्ह धारण केलेले नाही.

वायुपुराणामध्ये (अ०४५, श्लोक ७५) वर्षं यद्भारतं नाम यत्रेयं भारती प्रजा । असे विधान भारतातील लोकांना उद्देशून केले आहे. यातील भारती हे पद भारतातील एवढ याच अर्थाने वापरलेले आहे. केवळ दुष्यन्तपुत्र भरताच्या वंशातील लोक असा अर्थ घेण्यात औचित्याचा भंग होतो. १७ व्या शतकात होऊन गेलेल्या बनारसीदास या प्रसिध्द हिंदी कवीने आपल्या बनारसी विलास या सुरस काव्यामध्ये केलेल्या पुढील विधानामुळे वाचकाच्या मनात कोणताहि संदेह शिल्लक उरणार नाही अशी खात्री आहे-

भरतखण्ड केप्राणी जे ते । प्रजा भरत राज कि ते ते[१]
भरत नरेश ऋषभ कि शाखा । ताते लोग पितामह भाखा[१]

(१) बनारसी विलास, ३८.

ऋग्वेदामध्येही या देशातील लोकासंबंधी विधाने आहेत-

विश्वामित्रस्य रक्षति ब्रहमेदं भारतं जनम्[१]

- ऋग्वेद, ३/१३/१३.

भरतवंशातील लोकांचे (भारतं जनम्) रक्षण विश्वमित्र करतो असे स्पष्ट विधान आहे, पण विश्वामित्र हा संपूर्ण भरतवर्षाचा मोठा प्रसिध्द लोकपाल राजा होता असे विधान कोठेच नाही. मात्र त्याची राजर्षी म्हणून खूप मोठी प्रसिध्दी आहे. म्हणून वशिष्ट ऋषी ज्या अर्थाने रघुवंशाचे हितेच्छू पालक होते केवळ त्याच अर्थाने विश्वमित्र ऋषी भारतातील सर्व लोकांचे हितेच्छू पालक होत एवढ ाच अर्थ घ्यावयाचा.

भगवान वर्ष - ऋषभवर्ष

एकंदरीत ब्रह्मपुराण, वायुपुराण आणि ऋग्वेदादी ग्रंथातील भारतं जनम् या पदाच्या अर्थामध्ये जो संदेह निर्माण केला जात असतो त्याचा पूर्ण परिहार महाभारतातीलच अनेक

ठिकाणच्या विधानामुळे होतो याचे अवलोकन या पूर्वीच केले आहे. भरतवर्षाच्या नामकरणाच्या परंपरेतील आणखी एक दूवा भागवत पुराणामध्ये मिळतो-

तस्य हीन्द्रः स्पर्धमानो भगवान्वर्षे न ववर्ष,
तदवधार्य भगवानृषभदेवो योगेश्वरः प्रहस्य
आत्मयोगमायया स्ववर्ष अजनाभं नामाभ्यवर्षत्ं

- भागवतपुराण, ५/४/३.

भगवान् ऋषभदेवांशी स्पर्धा करणा-या इंद्राने ऋषभवर्षामध्ये पाऊस पाडला नाही. हे लक्षात घेऊन योगसामर्थ्यामध्ये सर्वश्रेष्ठ असणा-या भगवान ऋषभदेवांनी हसून आपल्या यौगिक सामर्थ्याच्या बळावर स्वत:च्या अजनाभ नावाच्या वर्षावर पाऊस पाडला.

येथे पूर्वीच्या अजनाभ (नाभिवर्ष) वर्षाला भगवानवर्ष असे स्पष्ट म्हटले आहे. भगवान म्हणजेच ऋषभदेव हेही उघड आहे. आणि ऋषभपुत्र भरताच्या कीर्तीमुळे त्याच वर्षाचे नामांतर भारतवर्ष असे झाले ही देखील वस्तुस्थिती आहे. नाभिराज आणि भरत यांच्या आंतरकालामध्ये ऋषभ राजाची कारकीर्द असून ते अत्यंत कुशल असे प्रजापाल म्हणून प्रख्यात झाल्याने मध्यंतरी ऋषभदेवांच्या नावानेही हा भूप्रदेश विश्रुत झाला होता असे दिससे. जेव्हा ऋषभांना राज्य मिळाले तेव्हा त्या वर्षाचे नाव ऋषभवर्ष म्हणण्याच्या बेतात होते पण ते नाव मोठया प्रमाणात रूढ झाले नाही. कारण ऋषभांच्या राज्यकालामध्ये नाभिराज जिवंत होते आणि त्यांच्य जीवनकालानंतर लगेच तो वर्ष भरताला देऊन ऋषभाने दीक्षा घेतली. त्यामुळे ऋषभवर्ष हे नाव पूर्णपणे रूढ होण्यास पुरेसा काळ मिळालाच नाही. पुढे भरताच्या चक्रवर्ती-पदामुळे या वर्षाला थेट भरतवर्ष असे नाव प्रचारात येऊन तेच प्ररूढ झाले. म्हणून हिमवर्ष - अजनाभवर्ष (नाभिवर्ष) - ऋषभवर्ष (भगवान वर्ष) - भरतवर्ष ही परंपरा सुसंगत आणि कालानुक्रमाला अनुसरुन योग्य ठरते.

अजनाभवर्ष

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील (८२/६) अजभ्य नाभौ या पदामध्येही अजनाभवर्षाचा संकेत निश्चितपणे अनुस्यूत असलेला अढ ळतो. मात्र ऋग्वेदामध्येच भारत नावाच्या एका मोठया

वंशाचा उल्लेख वरचेवर आढ ळतो. ब्राह्मणग्रंथामध्येही भारतवंशीयांचा संदर्भ आढ ळतो. यज्ञप्रसंगी एष वो भरता राजा असा संबोधनात्मक उल्लेख भारतवंशीयांना उद्देशून केलेला आढ ळतो. तो वंश मात्र शकुंतला पुत्र भरतानंतर त्याच्याच नावाने रुढ झाला होता आणि तो महाभारतकाळी देखील विद्यमान होता. हा भरताच्या कालापूक्षा फारच अर्वाचीन कसा ठरतो हे नुकतेच पाहिले आहे.

देश-नामकरणाची परंपरा

या निरनिराळ्या उल्लेखांच्या इतिहासावरुन आपल्या देशाचे नाव शेवटी भरतवर्ष असेच निश्चितपणे स्वीकारण्यात आले. ते का, कसे आणि त्या पाठीमागे कोणत्या घटना घडल्या आहेत यासंबंधी काही संगतवार विचारधारा आपण तयार करु शकतो-

(१) या भूक्षेत्राला एक विजय किंवा एकचक्री राज्य या विशिष्ट पारंपरिक अर्थाने वर्ष शब्द वापरण्याची एक खास परंपरा पूर्वकालापासून प्रचलित आहे. यात एका खास जैन संस्कृतीचे दर्शन होते.

(२) जंबू द्वीपातील या दक्षिणेकडील वर्षाला उद्देशून जी नावे साहित्यात नोंदलेली आढ ळतात ती मुख्यत: भौतिक आणि व्यक्ि त्वाचक अशी दोन प्रकारची आहेत. आपणास उपलब्ध असलेले पहिले नाव हिमवर्ष (हैमवत) हे बहुतेक सीमादर्शक असे भौतिक किंवा प्राकृतिक नाव, या वर्षाची मर्यादा आखणारा मानदण्ड असा जो आजचा हिमालय किंवा पूर्वीचा हैमवत नावाचा महापर्वत आहे, त्याच्यावरुनच प्रचलित झाले असावे. कारण त्या पर्वताचे नाव पवित्र असून ते अविस्मरणीय आहे.

(३) पुढे सत्ययूगाची किंवा भोगभूमीची स्थिती पालटू लागल्यावर मन्वंतरांच्या संधिकालामध्ये मनूंच्या विशिष्ट व्यक्ि तमत्वामुळे व सामाजिक जीवनातील त्याच्या स्थानामुळे या वर्षाला मनूंचा वर्ष किंवा त्याच अर्थाने मानव वर्ष असे ही म्हणत असावेत. पुष्कळजण या

नामकरणाचा संबंध फक्त पहिल्या मनूशीच लावतात. पण त्यात तशी निश्चिती नाहीच. हे नाव पद-विवरणात्मक आहे. तरी पण यासंबंधी मोठया प्रमाणात उल्लेख उपलब्ध नाहीत.

(४) हळू हळू मन्वंतरएिचांही काळ मागे सरला. कृतयुगाची पहाट होउू लागली. संधिकालाचा शेवट समीप आला असताना नाभिराज सामाजिक जीवनामध्ये अति थोर पदाला चढ ले. मनूंच्या मालिकेतील तो अंतिम मणी. तत्कालीन सामाजिक जीवनामध्ये त्यांचे कार्य युगप्रवर्तक ठरले. व्यक्ति त्वाचा एक उच्चतम बिदू त्याने मानवी जीवनात प्रथमच गाठला. म्हणून या वर्षाला व्यक्ति त्वाचक असे पाहिलेच नाव मिळाले ते याच थोर विभूतीवरून. त्यांच्यावरू न या वर्षाची ख्याती नाभिवर्ष म्हणून पसरली.

त्या नाभिराजाला मात्र जन्मत: नाळ नव्हती. अर्भकाना जन्मत: नाळ दिसू लागली ती नाभिराजाच्या प्रजेपासून पुढ च्या काळातच. त्यांचे हे त्या काळातील वैशिष्ट्य लक्षात घेउून नाभिराजाची प्रजा त्यांना अजनाभ (जन्मवेळी नाळ नसलेली) म्हणून ओळखी लागली. तेच नाव अधिक प्रसिध्द झाल्यावर त्याच्या वर्षाला (या क्षेत्राला) अजनाभवर्ष अशी संज्ञा प्राप्त झाली आणि ती दीर्घाळ प्रचलित राहिली. हेच व्यक्ति त्वाचक असे पाहिले नामकरण.

(५) ऋषभ हे अजनाभ्प्रसिध्द पसभिराजचे पुत्र मन्वन्तराचा अेत व कृतयुगाचा आरंभ. या संधिकालातील समाजधुरिणत्त्वाचा एक महत्वाचा दुवा. राज्यसंस्थ्ेच्या अंगोपंगांची प्रथम रचना यांनीच केली. गुगादिराज ही यांची प्रथम प्रसिध्दी. पण यांच्या राज्यकालामध्ये नाभिराज विघमान होते. त्यामुळे ऋषभांच्या उत्कर्षकाळी देखील पूर्वीचे नाभिवर्ष किंवा अजनाभवर्ष हेच नाव प्रचलित राहिले. तरी पण ऋषभाचा वर्ष किवा भगवान्वर्ष अशी आदरवाचक नावे साहित्यात आढ ळ्तातही. परंतु या भूमीला ऋषभवर्ष अशी फार मोटी प्रसिध्दी मिळण्यास वावच मिळाला नाही हे खरे. पुढे धर्मचक्र परिवर्तन करून तीर्थाची स्थापना करण्यासाठी राज्यत्याग करून, जेष्ठपुत्र भ्ंरताला राज्याभिषेक करू न, भगवान ऋषभनाथ तपश्चर्येसाठी निधून गेले. तेच जैनांचे पहिले तिर्थकर होत. त्याचे नाव लौकीक बाबीसाठी वापरणे कदाचित लोकानाही गैर वाटले असावे किवा तसे करणे भगवंताना आवडणार नाही असे वाटले अेल, म्हणून ऋषभ्वर्ष ह नाव मोठया प्रमाणात प्रचलित झाले नाही.

(६) जेव्हा भगवान ऋषभदेव तीर्थकरांना केवलज्ञानाची प्राप्ती झाली त्याचवेळी भरतराजालाही चक्ररत्नाची प्राप्ती झाली. पुढे त्यांनी षटखण्ड भूमी पादाक्रात केली. तो वर्षाधिपती झाली. तो या भूमीवरचा प्रथम चक्रवर्ती. त्याच्या कारकीर्दीत राज्यसंस्थेत व कारभ्ांारात मोठी स्थित्यंतरे घडून आली. दण्डशासनाला नवे वळण मिळाले. त्याच्या कर्तबगारीला स्मरून लोंकानी नाभिवर्षाला नव्याने भरतवर्ष असे गौरविले. त्याच घटनेची स्मृती आजही अक्षुण्ण असून भरताच्या नावाची कीर्ती भरतवर्ष अशा अक्षरांमध्ये अक्षरत्व पावली आहे.

(७) हिमवर्ष (हैमवत) -> मनूचा वर्ष -> नाभिवर्ष (अजनाभवर्ष) -> भगवानाचा वर्ष (ऋषभवर्ष) -> भरतवर्ष ही नामकरणाची परंपरा सर्वाना सम्मत आहे. मनू नाभिराज हे तीर्थकरजनक, नाभेय ऋषभनाथ हे जैनांचे आघ तीर्थकर आणि ऋषभेय भरत हे ऋषभाचे प्रथम पुत्र, प्रथम चक्रवर्ती, ऋषभनाथ तीर्थकरांचे प्रमुख अनुयायी आणि जिदीक्षा घेऊन ऋषभाच्या पाठोपाठ मोक्षाला जाणारेही पहिलेच चक्रधर राजे आणि या वर्षाचे नामस्मृतिलखणात्मक नित्य नवे असे शाश्वत नामकरण घडविणारे पहिले वर्षाधिपती. अशा रीतीने या नामकरणं् परंपरेतील सर्व तीनच्या तीन विभूती जैन संस्कृतीशी संबंधित असल्याने आणि तो सबेंध अकाटय व अतूट असल्याने या वर्षाचे सध्य: कालीन भरतवर्ष किवा भारत हे नामकरिण जैन परंपरेतूनच निष्पन्न झाले आहे ही बाब संदेहातीत सिध्द होते. सर्वभाषेतील सर्व प्रमुख गंथामध्ये या इतिवृताला पूर्ण मान्यता लाभलेली आहे. तर्कशुध्द पुराव्यानी परिपुष्ट असल्याने हा नामकरणाच्या परंपरेचा प्रश्न वादातीत आहे !

(८) हेच ऋषभपुत्र भरतचक्री आघ भारत होत. दुष्यन्तप्रत्र भरत हा कालक्रमाने फारच नंतरचा. केवळ दुसन्याच पीढ ीत जन्मला आणि ज्ञात विश्वातील पहिला चक्रवर्ती झाला. तर दुष्यंतादिक कित्येक सम्राट व कित्येक वंश शकुंतलापुत्र भरतापूर्वी या क्षेत्राचे प्रशासन करीत होते. भरत-वंश तर उघडपण दुष्यन्तपुत्र भरतानंतरचाच. तो वंश प्रसिध्द असला तरी वर्षव्यापी कधीच नव्हाता. त्याहीपेक्षा मोठे वंश पूर्वकाळी व त्याकाळीही या वर्षात नांदत होते.

(९) परंतु नंतरच्या काळी, एका जैन राजाला व जिनपरंपरेला एवढ ीमोठी प्रतिष्ठा प्राप्त झालेली पाहून मत्सर वाटल्याने कोणी तरी एका व्यक्तीने दुसन्या एका भ्ंारत राजीची कल्पना उचलून धरली असावी. जो चक्रवर्ती (सम्राट) पदाला चढ ला होता, ज्याने अनेक अश्रमेध निर्विघ्नपण पार पाडले हाते असा एक अन्य भरत राजा शोधला व त्याचे नाव प्रस्तुत प्रकरणी

धुसडविण्याचा अपुरा प्रयत्न केला असावा. आणखी दुसऱ्यांनी भरत शब्दाचा अर्थ बदलून आघ मनूविषयी संभ्रम निर्माण केलेला दिसतो. त्यामूळे काही वेदनिष्ठ जैनद्वेष्टयांना तेव्हढेच फावले. पण असा एखादा अर्धा-मुर्धा उल्लेख सोडला तर बहुसंख्यच नव्हे तर बहुतेक सर्व हिदू पुराणातील इतरही साहित्यातील सव्र वियधाने निरपवादपण एकस्वरू पीच आह्ढ ळ्लात. त्यात थोडीही विसंगती नाही. अशा सर्वव्यापी साहित्य परंपरेमध्ये या वर्षाच्या नामकरणाच्या संदर्भात ऋषभपुत्र भरतचक्रीचाच पुरस्कार सर्वत्र केलेला आहे. दुष्यन्तपुत्र भरताचे या वर्षाच्या नावावरील स्वामित्व कोणत्यही ग्रंथाला मान्य नाही. त्यामागे कोणतीही सुसंगत परंपरा नाही. ते सर्व पूर्वकालीन भारतातच राहात होते.

(१०) या संदर्भात चिकित्सापध्दतीने उपलब्ध असलेल्या सर्व साहित्याचे आलोचन करॅन ज्यांनी ज्यांनी आपापली निर्णायक मते सादर केली अशा डॉ. जयस्वाल, आचार्य बलदेव उपाध्याय, डॉ. अवधबिहारीलाल अवस्थी, डॉ. पी. सी. रायचौधरी, डॉ. मंगलदेव शास्त्री, डॉ. वासुदेवश्ंरण अग्रवाल, डॉ. प्रेमसागर जैन, प्रि. आर. डी. करमरकर इत्यादी सर्व जैन व अजैन मान्यवर पंडितांनी आपल्या देशाच्या नावावरील स्वामित्व ऋषभपुत्र भरतचक्रीचेच आहे हे नि:संदिग्धपणे मान्य केले आहे. यासंबधी योग्य असे संदर्भ त्या त्या मुघाच्या विवेचन प्रसंगी याच पुस्तकात दिलेले आहेत.

(११) याच विषयावर संशेधनप्रसिध्द प्रि. आर. डी. करमरकर यांनी **The Original name of India** या विषयावर अेक शोधनिबंध लिहून तो लखनौ येथील प्राच्विघा परिषदेच्या अधिवेशनामध्ये इ. स. १९५१ साली वाचला होता. तोच इंग्रजी लेख नंतर इ. सन १९५५ साली भाण्डारकर प्राच्यविघा संशोधन मंदिरातर्फे प्रकाशित होणाऱ्या वार्षित वृत्तांताच्या ३६ व्या खण्डयातील पहिल्या-दुसऱ्या भ्ंागामध्ये पन ११४ ते ११८ वर छापून प्रसिध्द झाला आहे. त्यामधील आपले निर्णायक मत प्रस्तुत करताना आपल्या निर्णयातील ५ व्या व ६ व्या मुघामध्ये ते म्हणतात-

प्रि. करमरकराचे मत

(1) …….(After Rsabha) …….. Bharata ruled for a very long time in an exemplary manner. This

memorable event was immortalised by the country being called after Bharata. One would have expected the country to be called Rssabhavarsa, but presumably Rishabha would not consent to that. Rishabha is a great Tirthankara of the Jains and it seems beyond question that it is after a Jain prophet that India got her original name.

(2) Later on, some one, not liking the idea of a jain ruler being so exalted, hit upon another Bharata who was also a chakravartin, who had performed a number of Asvamedhahs. But the majority of the puranas have not accepted this claim of Bharata – the son of Dusyanta.

(3) B. O. R. Institute Annals, volume 36 (1955) page 118 etc.

सार्वत्रि सुसंगती

या ग्रंथातील मागील प्रकरणात या वर्षाच्या नावाचा उपोध्दात करणारे व परंपरेतील सुसंगती सिध्द करणारे जैन साहित्यातील काही उतारे देउून येथे त्याला पुश्टी देण्यासाठी जैनेतर ग्रंथातील काही अवतरणे वाचकांसमोर सादर केली आहेत. याशिवायही सर्वच जैन परंपरेत व इतरत्रही आपल्या देशाच्या नामकरणाचा इतिहास एकमुखीच आहे. त्याचप्रमाणे काही आरण्यक ग्रंथ शिवपुराणातील आणखी काही विधाने, अग्निपुराण १०८/११-१२, नागपुराण, श्रीमालपुराण, मनुस्मृति अशा इतर गं्रथातही भरत वर्षाच्या नामकरणासंबंधी आणि त्याच्या जैन परंपरेसंबधी एकवाक्यता अढळते. ही सार्वत्रिक सुसंगती विस्मयजनक आहे ज्या भरत राजाच्या नावावरून या देशाला भरतवर्ष किवा भारत म्हणतात तो भरतचक्री जैन तीर्थकर ऋषभनाथांचाच

ज्येष्ठ पुत्र होय. या इतिवृत्तामध्ये तिळमात्र शंका उरण्याचे कारण नाही. त्याची वांशिक परंपरा मनू नारभिराज - तीर्थकर ऋषभराज चक्रवर्ती भरतराज अशीच आहे. प्राचीन भारतीय साहित्यातील सर्व प्रवाह या विधानाशी सहमत आहेत हे वरील विवेचनावरून सर्वाच्य लक्षात येईलच.

: ७ :

नाभिवर्ष

प्रजानां हितकृदभूत्वा भागभूमिस्थितिच्युतौ ।
नाभिराजस्तदोदभूतो भेजे कल्पतरू स्थितम ॥
- महापुराण, ३/२०६.

७ : नाभि-वर्ष

युगारंभाचा इतिहास

हया आपल्या भरतवर्षाचे नाव जर ऋषभपुत्र भरत चक्रवर्तीच्या नावावरुन प्रचलित झाले आहे तर भरतचक्रीचा उदय होण्यापूर्वी या वर्षाचे नाव काय होते असा प्रश्न सहजच निर्माण हेाते. हा प्रश्न तर्कसंगत असल्याने त्याचाही विचार करणें क्रमप्राप्त आहे. माहपुराणासारख्या प्रख्यात जेन इतिहास ग्रंथात आणि ऋग्वेदापासून पुराणापर्यतच्या हिदूं इतिवृत्त ग्रंथात या संदर्भात काही प्रमाणभूत उल्लेख मिळतात. जिसेनकृक महापुराण तर जैनाचा ज्ञानकोष आहे. त्यात युगारंभकालीन इतिहास जपून ठेवलेला आहे.

भंगवान भारते वर्षे भोगभूमिस्थितिच्युतौ ॥
कर्मभूमिव्यवस्थायां प्रसृतायां यथ्ंायथम ॥ ३ ॥

तथा कुलधरोत्पत्तिः त्वया प्रागेव वर्णिता ॥
नाभिराजश्च तात्रान्त्यो विश्वक्षत्रगणाग्रणी : ॥ ४ ॥

स एष धर्मसर्गस्य सूत्रधांर महाधियम ॥
इक्ष्वाकुज्येष्ठमृषभंक वाश्रमे समजीजनत ॥ ५ ॥

इह जम्बूमतिद्वीपे भारते खचराचलात ॥
दक्षिणे मध्यमे खण्डे कालसंधौ पुरोहिते ॥ ८ ॥

पूर्वोक्त कुलकृत्स्वन्त्यो नाभिराजोग्रिमोप्यभूत ॥ ९ ॥

स. नाभिर्भाविनां राज्ञां सनाभि: स्वगुणांशुभि: ।
भास्वानिव बभौ लोकेभास्वन्मौलिर्महाद्युति: ॥ १० ॥

-महापुराण, १२/३ ते १०.

पूर्वकाली कृतयुगाला प्रारंभ होण्याच्या अगोदर या भूंमीवर धर्म-अधर्म-व्यवस्था-रहित अशी भ्ोगभूंमी होती. ती अवस्था कालप्रभावाने संपत आली असताना आणी कर्मभूमीची व्वस्था प्रस्तुत होण्याचा योग आला असताना त्या मध्यंतरीच्या संधिकालामध्ये कुलधरांची उत्पत्ती झाली. त्या कुलधरापैकी नाभीराज हा अंतिम कुलकर होय. तोच क्षेत्रातील प्रशासन व्यवस्था पाहणान्या सर्व क्षत्रियाचा प्रणेता होय. कृतयुगातील धर्मव्यवस्थेचा सूत्रधार, महाबुध्दिमान, इक्ष्वाकू वंशाचा कारक अशा ऋषभनाथ्ांना त्यानेच जन्म दिला. युगपरिवर्तनाच्या संधिकालामध्ये तोच नाभिराज या जंबू द्वीपातील आपल्या भ्ंरत क्षेत्राच्या मध्येभ्ंागी वसलेल्या अयोध्येत प्रजापालन करीत होता. तो या क्षेत्रात पुढे होणान्या सर्व राजमडलाच्या केन्द्रुथिंानी आत्मप्रभेने प्रकाशत होता. सर्व विश्वावर प्रकाश पाडणान्या किरणाच्या केन्द्रस्थ्ांनी जसा महातेजस्वी सूर्य हा अधिष्ठाता असतो तसे या क्षेत्राला नाभिराजाचे अधिष्ठान प्राप्त झाले होते.

नाभिकालीन लोकस्थिती

त्या नाभियुगाच्या शेवटच्या चरणामध्ये आणि संपूर्ण कृतयुगाच्या सृष्टीमध्य ऋषभदेवाचे कर्तृत्व महान असले तरी नाभिराजालाही त्या प्रक्रियेमध्ये ज्येष्ठत्वाची जबाबदारी अंगीकारावी लागली. मात्र जेव्हा नाभिराजचा उदय झाला होता तो काल तर कर्मभूमीपेक्षा भ्ंागभूमीच्या

प्रभ्ांवाने प्रेरित होता. कृतयुगातील हीयमानता त्यावेळी प्रादुर्भूत नव्हती. त्यावर भ्ांरगभूमीची छायाच अधिक असल्याने लोकस्थिती वेगळी होती. त्या अवस्थेचे वर्णन महापुराणात पुढील प्रमाणे केले आहे-

यदभुंवां न जरातडडा न वियोगो न शोचनम ॥
नार्निष्टसम्प्रयागश्च न चिन्ता दैन्यमेव च ॥ ७३ ॥
न यत्र विरहोन्मादो न यत्र मदनज्वर: ॥
न यत्र खण्डना भोगे सुखं यत्र निरंतरम ॥ ७५ ॥
न विषादो भयं ग्लानि: नारू चि: कुपितऊाच न ॥
न कार्पण्यमनाचारो न बली यत्र नाबल: ॥ ७६ ॥
यत्र पुण्योदयान्नित्यं ररम्यन्ते नरा: सुखम ॥ ७७ ॥
सुख यत्रा तिशेते तां चक्रिणो भागसम्पदम ॥ ७८ ॥
यत्र दीर्घायुषां नृणा नाकण्डै मृत्यु संभव: ॥
निरॅपद्रवमायु: स्वं जीवन्त्युक्त ाप्रमाणकम ॥ ७९ ॥
सर्वे पि समसंभोगा यत्र विन्दन्त्यनामया ॥ ८० ॥

- महापुराण, पर्व ९/७३ ते ८०.

या काळात जन्मलेल्या जीवांना म्हातारपणाची व रोगाची पीडा नसते. आणि वियोग, शोक, अनिष्ट-संयोग, चिंता, दैन्य यांचाही त्रास होत नाही (७३). तसेच वियोगोन्माद, मदतबाधा, भोगोपभोगामधील व्यत्यय या आपत्तीही नसल्याने येथील सुखी आयुष्यात खण्ड पडत नाही (७५). येथे विषाद नाही, भिती नाही, थकवा नाही, अस्वास्थ्य नाही, कलह नाही, दैन्य नाही, अनाचारही नाही आणि येथे कोणी बलात्कारी नाही किवा कोणी दुबळाही नाही (७६). येथील लोक पुण्ययोगामुळै सदैव सुखक्रीडा करीत राहतात (७७). ते सर्व दीर्घायुषी असून त्यांना अकालमृत्यू शिवत नाही. त्यांचा जीवनक्रम निरूपद्रवी असून ते सर्वजण आयुष्यभ्ंर सुखाने जगतात (७९). सर्वजण मिळून समभ्ांवाने भोग घेतात. सुखाची प्राप्ती सर्वाना समानच असते आणि सर्वजण सदैव निरामय राहून सर्व ऋतुमानातील भोग सुखाने भोगतात (८०).

मात्र कालदशेच्या हीयमानतेमुळे ही अवस्था नाभिराजाच्या हयातीतच संपुष्टात आली. प्रजेची व्याकुलता वाढ तच राहिली. त्यामुळे नाभिराजाचा प्रजापालनात्मक भार वाढ तच गेला. ते अनभिषिक्त असले तरी क्षत्रियाग्रणी असल्यान त्यांनीच प्रजापालनाची जबाबदारी अंगीकारली. भोगभूमीच्या हीयमान अवस्थेत प्रजापालनाचा आरंभ प्रजेच्या जन्मापासूनच होत असतो. कालपरिवर्तनामुळे जन्मापासूनच काही अडचणी निर्माण होत होत्या. त्यमध्ये पहिली अडचण अर्भकाची नाळ कापण्यासंबधीची ती नभीनी दूर केली (तिलोयपण्णत्ति, ४/४९/६). म्हणून ते आयुरोग्य प्रदान करणारे प्रथंम वैघ होत. प्रजापालन करणान्यला आवश्यक अशा सर्व गुणांनी ते मंडित होत. दीर्घायुष्य, समुननंत शरीर, अप्रतिम रू प-सौदर्य, अप्रतिहत बल-विक्रम आणि पूर्ण विकसित कला-विज्ञान-चातुर्य, यामुळे ते त्या काळी सर्वश्रेष्ठ मानव ठरले (महापुराण, १२/९). भागवत कारानही त्यांना असेच श्रेष्टतम मानले आहे (भागवत, ११/२/१५). नाभिराजे मनाने उदात्त आणि ऐश्वर्याने उदार असल्याने ते श्रेष्ठ कुलक बनले. लौकीक अर्थाने त्यांचा राज्याभिषेक झाला नव्हता व त्यांनी स्वत:चे सैन्यही निर्माण केले नव्हते. दण्डपरिवर्तनासाठी त्यांना तशी आवश्यकताही भसली नव्हती. पण शेवटी शेवटी प्रजेच्या परस्पर विरोधी वर्तनामुळै जेव्हा तशी गरज निर्माण झाली तेव्हा काळाला अनुसरून अतीव योग्य अशा आपल्या ज्येष्ठ मुलाल त्यांनी लोकाकडून राज्यभिषेक करविला. आणि आतापर्यत व्यक्ति मूलच असलेल्या शासनाला प्रथमच संस्थास्वरू प बनविले. दुर्बलाना बल राजा या मंत्राने त्या संस्थेंत पंचप्राणासाची प्रतिष्ठा केली. या सांस्कृतिक स्थित्यंतराला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त करू न देणार ऋषभनाथ पहिले अभिषिक्त व प्रशाशक बनले. नाभिराज स्वत: राज्यप्रमुख नसले तरी ते रज्यसंस्थंचे जनम मात्र खासच आहेत. त्यांच्य जीवन कालातच हा मोठा नवीन बदल घडून आला. ते स्वत अंतिम कुलकर असूनही आदिराज ऋाभाचेच नव्हे तर य कृतयुगातील आदिम राज्यसंस्थचेही अदिजनक तेच आहेत. ते जरी नव्या दण्डनीतीचे व नव्या राज्यव्यवस्थेचे प्रत्यक्ष शिल्पकार नसेल तर त्य शासन संस्थेंचा पाय त्यानी रचला आहे. अशा महान कर्तबगारीमुळे आदिराज ऋषभाच्या कारकीर्दीतसुध्दा या भूमीला नाभिवर्ष हेच ना प्रवर्तमान राहले.

ऋषभांनी दण्डनीती बदलली. त्यात नवी भर घातली. दण्डनीती नाभिकाली तीन प्रकारचीच होती ती त्यांनी पाच प्रकारची केली. आपल्या क्षत्रिय प्रजेचे भोग, उग्र, राजन्य व नाग असे चार वर्ग पाडून त्यांच्याकडून राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था सुरळीत पाळून घेतली. पण या कालखंडामध्ये नाभ्रिाजही विघमान होते. पूर्वी ते सर्वप्रमुख कुलपुरू ष होते. आता ते भोग या उच्च व ज्येष्ठ वर्गियाचे अध्वर्यू झाले. त्यामुळै या वर्षाचे नाव नाभिवर्ष हेच नाव प्रचारात रूढ राहिले. पुढे नवा बदल भरताच्या राज्यकाळीच घडून आला. त्याने ऋषभप्रणीमत पाच प्रकारची दण्डनीती परिपुष्ट करून ती सात प्रकारची केली आणि चक्ररत्नाची प्राप्ती झाल्यावर दिग्विजयपूर्वक सर्व वर्षान्त भूमी पदाक्रांत केली. अशा कित्येक नव्या घटना भरतयुगातच घडल्या म्हणून त्याच्यच काळी या भूमीचे पुन भारतवर्ष असे नवे नामकरण झाले. केवलज्ञान प्राप्त झ ाल्याने त्यावेळी ऋषभनाथ धर्मतीर्थाचे प्रवर्तन करीत होते. त्या क्षेत्रातही त्यांचे स्थान सर्वश्रेष्ठ व सर्वप्रथम असेच राहिल. आदिनाथ आणि आदिमत्व एकरू पच हेात राहतात.

अभीष्टफलदायी क्षत्रियता

नाभीचा काल दोन युगातील संक्रान्तिकाल हेाता. त्यांच्या कुलकर कार्याला आरंभ् झाला तेव्हा या क्षेत्रातील व्यवस्थ्ंा भोगभूमीच्या अंतीम अवस्थेसारखी हेाती. मानवामध्ये जीवनाचा झ ागडा निर्माण हेात हेाता परंतु अपराधी मनोवृत्ती अजून पोसवली नव्हती. उपजीविका कष्टप्रधान होत होती पण परस्पर सदभ्ंाव नष्ट झाला नव्हता. परंतु त्यांच्या जीवनकालामध्ये भोगभूमी निष्पभ झाली. उपजीविकेच्या प्रश्न निर्माण झाला. विकारी मनोवृत्ती लोकाचा अंगी बापू पहात होती. कर्मभूमीची व्यवस्था सुरु होण्यास काल अनुकुल होत होता. नवे प्रश्न निर्माण झाले. ते सोडविण्याचा मार्ग शोधावा लागला. दुर्बलांना संरक्षण देण्याची गरज भ्ंासली. ते स्वत: लोकत्राता बनले. त्राणक्षम लोकाना क्षत्रिय म्हणण्यात येऊ लागले. दु:खिताना त्राता मिळाला. त्यांचाही निर्वाह होउू लागला. नाभ्ी हा ज्येष्ठ त्राता असल्याने ते क्षत्रियप्रमुख बनले. नाभ्ी आणि क्षत्रिय हे दोन शब्द एकार्थवाची बनले. तोच अर्थ प्रचलित झाला. अमरकोषात क्षत्रिये नाभि: असे विधान आहे. अभिधान-चितामणीतही नाभिश्च क्ष्ंत्रिये असे म्हटले आहे. त्याने आपल्या पुरू षार्थाच्या जोरावर न्याय स्र्थापण्याचा प्रयोग केला. महापुराणात उल्लेख आहे की-

शशीव स कलाधार: तेजस्वी भानुमानिव ॥
प्रभु: शक्र इवाभ्ीष्टफलद: कल्पशाखिवत ॥ ११ ॥
- महापुराण्ं, १२/११.

पूर्ण चन्द्राप्रमाणे ते सर्व कलाचे धारक होते. त्यांचा पराक्रम सूर्याप्रमाणे सर्वगामी होता. ते इन्द्राप्रमाणे वैभवसंपन्न होते आणि कल्पवृक्षाप्रमाणे सर्वाच्या मनोरथाची पूर्ती करीत होते. त्यामुळे त्यांना युगप्रवर्तन पूर्णपणे साधले. आजकालच्या विध्वंसक घडामोडीही त्यांची कीर्ती नष्ट करू शकत नाहीत. कालचक्राच्या ते केन्द्रस्थानी अविचल राहिले. त्यांचे नाव अक्षर झाले आहे. त्याला क्षती नाही. भ्ंारतीय परंपरेतच नव्हे तर बाहेरही ते चिरंजीवी झाले आहे. संस्कृतमध्ये नाभि, प्राकृतमध्ये नाभि तर अरबीमध्ये नबी या स्वरू पात त्याचे नाव प्रचलित आहे. नबीचा अर्थ आहे- देवदूत, पैगंबर, रसूल! त्या शब्दाचे उदरात्तीकरणच झालें आहे.

पहिले व्यक्ि त्वचवाचक नामकरण

संक्रमण युगातील त्यांचे कार्य क्षेात्रव्यापी झाल्याने या क्षेत्राला व्यक्ि त्मत्व लाभले. म्हणून पूर्वीचे विभागदर्शक हिमवर्ष हे भौतीक नाव बदलून या खण्डाचे नवे व्यक्ि तनिष्ठ नाव नाभिखण्ड असे प्रवत्तित झाले. हा वर्ष नव्याने नाभिवर्ष बनला. नाभिराजाचे दुसरे गुणविश्ेषात्मक नाव अजनाभ असे असल्याने या वर्षाला अजनाभवर्ष असेही म्हणू लागले. त्यांनी प्रसूतिक्रियेतील नाळ कापण्याची विघा प्रकट केली. पण ते स्वत: ज्या भोगभूमीच्या अवस्थेत जन्मले त्याच्या प्रभ्ंावाने जन्मत: त्यांना नाळ नव्हतीच. ते निसर्गतच अजनाभ (नाळ रहित) होते.

स्कंदपुराणीमधील-

हिमाद्रिजलधेरन्तर्नाभिखण्डमितिस्मृम । (१/२/३७/५५).

या चरणामध्ये नाभ्खिण्ड या नावाचा स्पष्ट उल्लेख आहे. या पदाचे विश्लेष्ंण करीत असताना प्राचीन भ्ंारतका भैगोलिक स्वरू प या आपल्या ग्रथात डॉ. अवधबिहारीलाल अवस्थी म्हणतात-

"सप्त द्वीपो वाली पृथिवी मे जम्बूद्वीप अत्यंत प्रसिध्द भूखण्ड था। आघ प्रजापति मनु स्वायम्भुव केपुत्र प्रियव्रत दस राज-कुमारो केपिता थे। उनमे तीन तो संन्यासी हो गये थे और सात पुत्रोने सात महाद्वीपो मे अधिपत्य प्राप्त कियाा ज्येष्ठ आग्नीध्र जम्बूद्वीप केराज हुए। उनकेनौ ल्रडकेजम्बूद्वीप के स्वामी बने। जम्बूद्वीप कि नाभ वर्षोंमे से हिमालया और समुद्र केबीच मे स्थित भूखण्ड को, आग्नीध्र केपूत्र नाभि केनाम पर ही नाभिखण्ड कहा गया"[९]

मार्कण्डेयपुराण : सांस्कृतिक अध्ययन या आपलया पुस्तकातील पान १३८ वर पदटिप्पणा १ मध्ये डॉ. वासुदेवशंरण अग्रवाल म्हणतात-

"स्वायम्भुव मनु केप्रियव्रत, प्रियव्रत केपुत्र नाभि, नाभि के ऋषभ और ऋषभदेव केसौ पुत्र हुए,जिनमे भरत ज्येष्ठ थे। यही नाभी अजनाभ भी कहलाते थे, जो अत्यंत प्रतापी थें और जिनकेनाम पर यह देश अजनाभवर्ष कहलाता थां[१०]"

अजनाभ नामैतदवर्ष भंारतमिति यत: आरभ्य व्यपदिशन्ति ॥

पूर्वीच्या अजनाभ-वर्षालाच यंथेून पुढे भारत असे म्हणू लागले. या बालबोध विधंानात केवळ पूर्व विधानाला पुष्ट साक्षच नसून ती संपूर्ण वर्षनामकरण परंपराच मान्य केली आहे. त्यामुळे त्या परंपरेचे सातत्य अधिक परिपुष्ट व समर्थनीय ठरते. आणि याच पुराणातील दुसया अनेक विधानामुळे याला चांगलीच पुष्टी मिळेते. भंगवातील ५/४/३ विधानामध्ये तर ऋषभाला ज्या वर्षाचे राज्य मिळाले त्याचे नाव अजनाभवर्ष हाते असा स्पष्ट उल्लेख आहे. शिवाय

अजभ्य नाभौ या ऋग्वेदातील (१०/८२/६) पदामध्ये देखील निश्चितपणे अजनाभ-वर्षाच्या नावाचा संकेत आहे.

नाभिवर्ष या नावाच्या अगोदर या भूमीचे नाव हिमवर्ष होते व नंतर ते नाभिवर्ष झाले याचे ज्ञान विष्णुपुराणातील खालील ओळीवरू न तर अधिकच स्पष्ट हाते. याला पुन: मार्कण्डेय पुराण, अग्निपुराण इ. ग्रथ्ांचीही साक्ष असलयाचे स्पष्टपण आढ ळते. या सर्व विविरणामध्ये हिमवर्षापासून भरतवर्षापर्यत या क्षेत्राची नामप्रणाली आणि नाभिराजापासून भरतचक्रीयपर्यत पृथ्वीपतीची शासनप्रण्ाली अगदी अक्षुण्ण असलयाचे स्पष्टपणे दृगोचर होते. या इतिहासाला प्राचीन साहित्यात सर्वत्र पुष्टी मिळते. या संदभ्र्ातील सर्वच पूर्वसूरीचा साक्ष सुसंगत व अनुकूल आहे-

हिमाहय यस्य वै वर्ष नाभेरसीन्महात्म: ॥ २७ ॥

तस्यर्षभाभवत पुत्रो मरदेवय्ज्ञं माहघूति: ॥

ऋषभादभरतो जसे ज्येष्ठ: पुत्रशतस्य स: ॥ २८ ॥

कृत्वा राज्यं स धर्मेण तथेष्टवा विधिान्मखान ॥

अभिषिच्य सुंत ज्येष्ठ भरत पृथिवीपति: ॥ २९ ॥

- विष्णुपुराण, भ्ंाग २, अध्याय १/२७-२९.

महात्मा नाभीच्या वर्षाचे पूर्ववर्ती नाव हिमाह (हिमवर्ष) हाते. नाभीला मरू देवीपून महातेजस्वी पुत्र झाला. त्याचे नाव ऋषभ. ऋषभाने राज्यकारभार धर्माने केला. विविध्ं प्रकारचे पूजामहोत्सव कले आणि शेवटी ज्येष्ठ पुत्र भरतला त्याने राज्यभिषेक केला.

मार्कण्डयेपुराणमधील अध्याय ५० श्लोक ३४ ते ४२ पर्यत हाच इतिहास सविस्तर दिला आहे. नाभिपिता आग्नीधापर्यत पूर्वकालीन मनूचे राज्य संपूर्ण जंबूद्वीपावर असे. पैकी नाभ्ीला फ्क त हिमवर्षाचे राज्य मिळाले. आणि नाभीपासून भरपपर्यताच्या परंपरेत श्ंासकाच्या कीर्तीला अनुसरू न अखेर भरतवर्षापर्यतचे नामांतर कसे घडून आले हे एका परिच्छेदात सागून टाकले आहे. हाच वृतात अग्निपुराणातील, अध्याय १०८, श्लोक ५ ते १२ मध्येही अगदी जशाचा तसा आढ ळतो.

नाभाराजाचे व्यक्तिमत्व

नाभिराज एक श्रेष्ठ कुलकर होते. पण त्यांचा काल होता वेगवान परिर्वतनाचा. मनुयुगाचा अंत व कृतयुगाचा अंत व कृतयुगारचा आरंभ असा तो एक महा संधिकाल होता. पूर्वस्थिती च्युत होत होती व नवी अवस्थां अघाप प्राप्त णाली नव्हती. त्यामुळे सामान्य लोक हवालदिल झाले होते. त्याना स्थैर्य प्रप्त करून देणे ही गोष्ट काही साधी नव्हती. अशा वेळी त्यांनी योग्य ती कामगिरी बजावजी म्हणून त्यांच्या नावाची किर्ती या भूमीशी एकरुप झाली आहे. पहिल्या प्रथमच या भूमी व्यवितत्ववाचक नाव प्राप्त झाले. ही एक अभिनव घटना नाभीच्या व्यक्तित्वाच्या जोरावर घडून आली. यांचा परिचय करू न देताना महापुराणकार म्हणतात-

तदनंतरमेवाभून्नाभि: कुलधर: सुधी: ॥
युगादिपुरषै: पुर्रैरू दूढ ाधुरमुदवहन ॥ १५२ ॥
युगमुख्यमुपासीना नाभि मनुमपश्चिमम ॥ १९२ ॥
इत्याधुपयकथनै: प्रीता: सत्कृत्य तं मनुम ॥
भेजुस्तघर्शितां वृत्तिं प्रजा : कालोचितां तदा ॥ २०५ ॥
प्रजाना हितकृदभूत्वा भोगभूमिस्थितिच्युतौ ॥
नाभिराजस्तदोदभूतो भेजे क त्पतरू स्थितम ॥ २०६ ॥
प्रजाना जीवनोपायमनान्मवो मता : ॥
अर्याणां कुलसंस्त्यायकृते: कुलकरा इमे ॥ २११ ॥
कुलाना धारणादेते मता: कुलधरा इति ॥
युगादिपुरू षा: प्रोक्त ा युगादौ प्रभविष्णव: ॥ २१२ ॥

- महापुराण, पर्व ३.

तेरा कुलकरानंतर क्रमाने नाभिराज या कुलकराचा अवतार झाला. ते फार बुध्दीमान होते. त्याच्या पूर्ववर्ती श्रेष्ठ कुलकरानी लोकव्यवसथची जी धुरा आजपर्यत वाहिली होती ती त्याने स्वत: अंगीकारली. . . . त्यावेळी लोकाची आहार संज्ञा अत्यंत तीव्र झाल्याने ते भुकेने व्याकूळ झाली. त्यामुळै ते सर्व युगपुरष नाभीकडे आले. नाभी अपश्चिम मनू होते. . . .त्या सर्व

